**प्रतिवादी क्र.१/क तर्फे उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील.**

**५.** मला इतर वादींनी त्यांच्या वतीने पुरावा देण्याबाबत वटमुखत्यारपत्र दिलेले नाही. पुर्वी आजरा गाव हे इचलकरंजीकर जहागीरदार यांच्या अधिपत्याखाली होते. त्यावेळी सर्व सरकारी जागा इचलकरंजीकर जहागीरदार यांच्या मालकीच्या होत्या. दावा मिळकती या जहागीरदारांच्या मालकीच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी राहण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा नसलेले लोक जहागीरदारांच्या जागेत घरे बांधून राहत होते.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, आमची व प्रतिवादींच्या पुर्वहक्कदारांची १९४२ साला पूर्वी पासून आज असलेल्या जागेवरतीच घरे होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.०९.१९४२ रोजी जहागीरदारांनी त्यांच्या जागेत घरे बांधून राहणा–या लोकांना त्या जागेची मालकी प्रदान केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.०९.१९४२ रोजी हुकूम क्र.९५७ ने सरकार हक्काची परडी मोजून दिली नाहीत. दावा मिळकतीमध्ये आज आमची व प्रतिवादींची घरे आहेत. मी त्यातील कोणाचे घर कधी बांधले आहे याबाबत निश्चित सांगू शकत नाही, ती घरे १९४५ सालानंतर बांधलेली आहेत.

**७.** आमच्या व प्रतिवादींच्या घरांची एक ते दोन वेळा दुरुस्ती झालेली आहे. दावा मिळकतीतील बरीचशी घरे माती व विटांच्या बांधकामातील आहेत. मी दावा मिळकती तील आज रोजी असलेल्या घरांचे फोटो दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला दाखवलेले फोटो व त्यावरील टिपा बरोबर आहेत. साक्षीदाराने सदर फोटो व टिपा मान्य केल्यामुळे त्यांना अनुक्रमे **नि. क्र.१२८ ते १३२** देण्यात येतात.

८. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतील इमारतींच्या भिंती स्वतंत्र नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या व प्रतिवादी क्र.१/क च्या घरांच्या दरम्यान स्वतंत्र भिंती नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१/क ने त्याच्या घराचे सन २००५ साली नूतनीकरण केले आहे. आमचे घर १९४५ सालानंतर बांधलेले असून मला त्याचे निश्चित वर्ष सांगता येणार नाही. आम्ही १९४५ सालानंतर सन २०००–२००१, सन २०२०–२०२१ दरम्यान आज अखेर पर्यंत दोन वेळा घराचे

नूतनीकरण केलेले आहे.

प्रश्न – तुमच्या व प्रतिवादी क्र.१/क च्या घराच्या उत्तरेला मोकळी जागा आहे ?

उत्तर – आमच्या घराच्या उत्तरेला मोकळी जागा असून त्यामध्ये सरकारी जागेची खंदक आहे.

**९**. खंदकाच्या उत्तरेला बी. एस. एन. एल. ची इमारत आहे. प्रतिवादी क्र.१/क ने सन २००७ मध्ये त्याच्या घराच्या उत्तरेकडील जागेत शौचालयाचे बांधकाम करणार असे म्हणल्यामुळे आम्ही त्याच्या विरोधात मनाईसाठी नि. दि. दा. क्र.७७/२००७ दाखल केला होता. मला त्या दाव्यामध्ये आमच्या वडिलांनी आमच्या जागेची सन २००६ मध्ये मोजणी करुन घेतल्याची बाब नमूद केल्याचे आठवत नाही. त्या दाव्या मध्ये आमच्या व प्रतिवादी यादव यांच्या जागेची न्यायालयीन आयुक्तांमार्फत मोजणी झाली होती. त्या मोजणीमध्ये आम्ही यादवांच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले होते.

**१०**. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यातील आमची तूर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी आजरा न्यायालयाने नाकारली होती. मला माझ्या वडिलांनी कि. दि. अ. क्र.४०/२०१० गडहिंग्लज न्यायालयात दाखल केल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यादव यांनी नि. दि. दा. क्र.७७/२००७ च्या अंतरीम मनाई हुकूमाच्या आदेशा प्रमाणे त्यांच्या जागेत शौचालयाचे बांधकाम पुर्ण केले आहे.

**११.** मला सन २००६ साली आमच्या वडिलांनी करुन घेतलेल्या मोजणी विरोधात इतर कोठेही अपिल केल्याची माहिती नाही. आमच्या वडिलांनी नि. दि. दा. क्र.७७/२००७ मधील मोजणी विरोधात कोठेही अपिल केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, न. भू. क्र.१०४९ व १०५० च्या सिटी सर्वेकडील लांबी–रुंदी आणि क्षेत्राची आमच्या वडिलांना सन २००६ पूर्वी माहिती होती.

**१२**. हे म्हणणे खरे आहे की, नि. दि. दा. क्र.७७/२००७ मध्ये प्रतिवादी यादव

यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये त्यांच्या घराच्या पश्चिमेकडील भिंतीचा आधार घेऊन आमचे घर असल्याची बाब नमूद केली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो, सदर बाब प्रतिवादी यादव यांनी चुकीची नमूद केली होती. आमच्या वडिलांनी सदर बाब चुकीची असल्याबाबत न्यायालयात प्रतिउत्तर दाखल केले होते. मी त्याची प्रत सादर करु शकत नाही.

**१३**. इचलकरंजीकर जहागीरदारांनी वाटप केलेल्या सात ब्लॉकपैकी सहाव्या क्रमांकाच्या ब्लॉकमध्ये विहिर आहे. त्याचा न. भू. क्र.१०४८ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरा गावात नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वीत होण्यापूर्वी जहागीरदारांनी वाटप केलेल्या सात ब्लॉकमधील सर्व लोक त्या विहिरीतील पाण्याचा वापर करत होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर विहिर ब्लॉकचे वाटप होण्याच्या १९४२ पुर्वीपासून अस्तीत्वात आहे. हे म्हणणे खरे आहे की, न. भू. क्र.१०४८ च्या प्रॉपर्टी कार्डला आमच्या व प्रतिवादींच्या पुर्वहक्कदारांची नावे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरती सार्वजनिक विहिरीची नोंद आहे. न. भू. क्र.१०४८ ला आमच्यासह प्रतिवादींच्या पुर्वहक्कदारांची नावे असल्याबाबत आम्ही या दाव्या व्यतिरिक्त इतर कोठेही तक्रार केलेली नाही.

(वकिलांच्या तोंडी विनंती वरुन उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)

**उलट तपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०५.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.